# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजूला, उस्मानपूरा

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax 2३५६८२०

http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com

जा.क्र.विकाऔ/आस्था-१/२०१७/ 7360

दिनांक 20 APR 2017

प्रति,

प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद

प्राचार्य, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद

उपसचिव, तंत्रशिक्षण मंडळ प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद, जालना,अंबड,जिंतूर,हिंगोली,नांदेड,उस्मानाबाद, बीड

पु.ला.शा.तं.लातूर,.म.तं.नि.लातूर

**विषय:-** महाराष्ट्र राज्यावर होणा-या भाषिक, सांस्कृतिक,सामाजिक,राजकीय आणि भौगोलिक आक्रमणाविषयी कळकळीचे आवाहन...

**संदर्भ:-** मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१६/संकीर्ण/२०१७/शा ६८६, दि.२४.०३.२०१७

उपरोक्त विषयाबाबत मराठी भाषा विभाग क्र.मगावा-२०१७/प्र.क्र.५/भाषा-२/दि.२३ जानेवारी,२०१७ रोजीचे पत्र व त्यासोबतचे अध्यक्ष, मराठी एकीकरण समिती (महाराष्ट्र राज्य) यांनी मुख्यमंत्री महोदयांना दिलेल्या दि.२२.१२.२०१६ रोजीच्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

सदर पत्रात नमूद केलेल्या व आपल्या संस्था/कार्यालयाशी संबंधित असलेल्या मागण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या/करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत अर्जदारास परस्पर कळविण्यात यावे व तसे या कार्यालयास अवगत करण्यात यावे.

(महेश शिवणकर)

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत:- या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहितीस्तव तसेच सदरचे पत्र या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी

Forwding Letter all instt. 2016/kakade

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

तार – EDUTECH E-mail : desk16@dtemaharashtra.gov.in Internet :http/www.dte.org.in

क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०१७/६३
दिनांक : २४।३।२०१७

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

**विषय : महाराष्ट्र राज्यावर होणा-या भाषिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय आणि भौगोलिक आक्रमणाविषयी कळकळीचे आवाहन...**

उपरोक्त विषयाबाबतचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२९-१७/आस्था-२, दिनांक २७.२.२०१७ पहावे.

सदर प्रकरणी मराठी भाषा विभाग क्र. मभावा-२०१७/प्र.क्र.५/भाषा-२, दिनांक २३.१.२०१७ रोजीच्या पत्रासोबत जोडण्यात आलेले अध्यक्ष, मराठी एकीकरण समिती (महाराष्ट्र राज्य) यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना दिलेल्या दिनांक २२.१२.२०१६ रोजीच्या पत्रामध्ये नमूद करण्यात आलेल्या या विभागाशी संबंधित मागण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या किंवा करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत अर्जदारास परस्पर कळविण्यात यावे.

सहसंचालक, तंत्रशिक्षण
वि.का. औरंगाबाद
आवक क्र. 3055
दिनांक 3 APR 2017

( अैनुल अत्तार )
विशेष कार्य अधिकारी,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :-

३) श्री. रा.वि. जाधव, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

# महाराष्ट्र शासन

mail-rajendra.jadhav62@nic.in
दूरध्वनी क्र.०२२ २२८५५७६६

क्र : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२९-१७/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा रोड,
४३१ (विस्तार),४ था मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २७.०२.२०१७

प्रति,

संचालक, ( उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालय ), महाराष्ट्र राज्य.
कुलगुरु, सर्व अकृषिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
उपसचिव ( महाविद्यालयीन शिक्षण / विद्यापीठ /तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालये ),
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.

विषय : महाराष्ट्र राज्यावर होणा-या भाषिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय आणि भौगोलिक आक्रमणाविषयी कळकळीचे आवाहन....

उपरोक्त विषयाबाबत मराठी भाषा विभाग क्र.मभावा-२०१७/प्र.क्र.५/भाषा-२, दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजीचे पत्र व त्यासोबतचे अध्यक्ष, मराठी एकीकरण समिती (महाराष्ट्र राज्य) यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिलेल्या दि. २२/१२/२०१६ रोजीच्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

सदर पत्रात नमूद केलेल्या व आपल्या उपविभागाशी / कार्यासनाशी संबंधीत असलेल्या मागण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या / करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत अर्जदारास परस्पर कळविण्यात यावे. तसेच या कार्यासनासही अवगत करण्यात यावे, ही विनंती.

( रा.वि.जाधव )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:

अध्यक्ष, मराठी एकीकरण समिती ( महाराष्ट्र राज्य ), १५, पूनम ओर्बिट इमारत, क्वीन्स पार्क, मिरा भायदंर मार्ग, मिरा रोड पूर्व, ठाणे, ४०१ १०७.

JAN 2017

उच्च ... शिक्षण विभाग
कार्यासन ...
दिनांक ...
आवक क्र. ...

२३६
३०/१/१७

९/५

क्र.- २०८३६०२

# महाराष्ट्र शासन

क्रमांक:- मभावा-२०१७/प्र.क्र.५/भाषा-२
मराठी भाषा विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक- २३ जानेवारी,२०१७.

प्रति,

१. अवर सचिव (समन्वय),
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय,मुंबई

२. अवर सचिव (समन्वय),
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय,मुंबई

३. अवर सचिव (समन्वय),
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
मंत्रालय,मुंबई

४.अवर सचिव (समन्वय),
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय,मुंबई

५. अवर सचिव (समन्वय),
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय,मुंबई

**विषय :- महाराष्ट्र राज्यावर होणा-या भाषिक,सांस्कृतिक,सामाजिक,राजकीय आणि भोगोलीक आक्रमणाविषयी कळकळीचे आवाहन.**

**संदर्भ :- अध्यक्ष,मराठी एकीकरण समिती(महाराष्ट्र राज्य) यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिलेले दि.२२.१२.२०१६ चे पत्र.**

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्राची प्रत सोबत जोडली आहे. सदर पत्रान्वये अध्यक्ष, मराठी एकीकरण समिती(महाराष्ट्र राज्य) यांनी महाराष्ट्र राज्यावर होणा-या भाषिक,सांस्कृतिक,सामाजिक,राजकीय आणि भोगोलीक आक्रमणाविषयी विविध मुद्द्याच्या अनुषंगाने आवाहन केले आहे.सदर पत्रातील आपल्या विभागाशी संबधित मुद्द्याबाबत तात्काळ कारवाई करण्यात यावी, आणि केलेल्या कार्यवाहीबाबत अर्जदारास कृपया कळविण्यात यावे.

श्री जडाले

(लिना वि.धुरू)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सहपत्र-वरीलप्रमाणे

प्रत- अध्यक्ष,मराठी एकीकरण समिती (महाराष्ट्र राज्य),ठाणे - ४०११०७

# मराठी एकीकरण समिती (महाराष्ट्र राज्य)

मराठी एकीकरण समिती

कार्यालय : १५, पूनम ओर्बिट इमारत, क्वीन्स पार्क, मिरा भाईंदर मार्ग,
मिरा रोड पूर्व, ठाणे ४०११०७ - महाराष्ट्र
९८९२८५१३४२, ९२२२२२३३३७, ९८६७८८६५९९, ९९३०५३५६१२


*एकच ध्येय, एकच ध्यास, मराठी भाषा, राज्य, संस्कृतीचे संवर्धन व विकास*

मुख्यमंत्री सचिवालय टपाल शाखा 09 JAN 2017 2030225 ई ऑफिस क्र.

दिनांक: २२/१२/२०१६

प्रति,

मा.मुख्यमंत्री,

महाराष्ट्र राज्य

विषय - महाराष्ट्र राज्यावर होणाऱ्या भाषिक, संस्कृतीक, सामाजिक, राजकीय आणि भौगोलीक आक्रमणाविषयी कळकळीचे आवाहन.

12/01/17 2039225

सस्नेह जय महाराष्ट्र,

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरून मराठी एकीकरण समितीतर्फे आपणास संपूर्ण महाराष्ट्रातील मराठी जनतेच्या वतीने कळकळीचे आवाहन करु ईचछीतो की, यशवंतराव चव्हाणांनी संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेचा कलश आणून आज ५६ वर्ष झाली, १०६ हुतात्म्याच्या शौर्याचा हा विजय होता, कलाक्रमानुसार या घटनेवर आज विस्मृतीची झापड पडत चालली आहे,

आपणास मराठी भाषिकांचे एक स्वतंत्र राज्य भेटले हा सार्थ अभिमान आम्ही काल परवा पर्यंत बाळगून होतो, परंतु इतिहासाची पाने पलटावीत तशी इथेही पाने पलटू लागली, ज्ञानेश्वर माउली सारख्या विभूतिनि चढवलेल्या अलंकाराने नटलेली मराठी भाषा तिच्याच मराठी राज्यात दयनीय अवस्थेत सापडलीय, अखंड महाराष्ट्राचा इतिहास साक्षीदार आहे,अवघा भारत देश परकीय आक्रमणकर्त्यांच्या गुलामगिरीच्या वीळख्यात पडला असताना शिवछत्रपतीनी स्वातंत्र्याची बीजे इथल्या मातीत रोवली त्याला अंकुर फुटून इथे एक मराठी स्वराज्य निर्माण झाले आणि देव, देश आणि धर्माकरिता अखिल भारताचा राष्ट्र म्हणून विचार करत मराठी माणसाने पानीपतावर दोन लाख मराठी रक्ताची आहुती दिली, हा असा पराक्रमी इतिहास लाभलेल्या मराठी जनतेवर त्यांच्याच राज्यात प्रत्येक क्षेत्रात दुय्यम आणि अपमानजनक वागणूक मिळते यांकरीताच आपणास कळ कळीचे आवाहन करावे लागत आहे ही दुर्दवी बाब आहे ,परंतु अन्यायाविरुध्द लढावे व कायद्याने मिळालेल्या हक्काची पायमल्ली होत असताना त्या विरुद्ध आवाज न उठवने हे खचितच मराठी माणसाचा स्वभाव नाही, यालाच अनुसरून आम्ही काही महत्वाच्या बाबीकडे आपले लक्ष केंद्रित करू इच्छितो,

मराठी भाषे संदर्भात शासन दरबारी आलेले औदासीन अगदीच राजकीय मतांपुरतेच उरले आहे याचा प्रतेय आपल्या राज्यात अजून पर्यंत मराठी भाषा केंद्र उपलब्ध नाही यावरून येतो, यांकरीता शासनाने मराठी भाषेच्या संवर्धनाकरीता व उत्कर्षकरीता एक स्वतंत्र मराठी भाषा विध्यापीठ उभारावे जेणेकरून त्यात "मराठी" या शब्दाभोवती

सार कळवावे


# मराठी एकीकरण समिती (महाराष्ट्र राज्य)

कार्यालय : १५, पूनम ओर्बिट इमारत, क्वीन्स पार्क, मिरा भाईंदर मार्ग,
मिरा रोड पूर्व, ठाणे ४०११०७ - महाराष्ट्र
९८९२८५१३४२, ९२२२२२३३३७, ९८६७८८६५९९, ९९३०५३५६१२


## एकच धेय्य, एकच ध्यास, मराठी भाषा, राज्य, संस्कृतीचे संवर्धन व विकास

जे जे म्हणून काही असेल इतिहास, साहित्य , संस्कृती, परंपरा व येथील लोकजीवन याचा त्यात समावेश असावा व त्याचा अभ्यास व्हावा, येणाऱ्या पिढ्याकरिता तो एका अमूल्य ठेव्यासारखा असावा, भारतीय चित्रपट सृष्टी स्थापन करणाऱ्या राज्यातच इथल्या स्थानिक मराठी चित्रपटांना,चित्रपट गृह मिळू नये म्हणून जाणीव पूर्वक प्रयत्न व्हावेत हा प्रकार अगदीच क्लेषदायक आहे , याबाबत इथल्या सर्वच सत्ताधारी व विरोधी पक्षांनी मिळून याबाबत कायदा परीदं करावा.

त्याच सोबत महराष्ट्रातील प्रमुख शहरे मुंबई,ठाणे,पुणे,नाशिक,नागपूर ईत्यादी अनेक लहान मोठ्या नगरात परराज्यातील लोकांचा भरना दिवसेंदिवस अगणित वाढत चालला आहे, आता त्यांच्या इथल्या स्थलांतराचा उद्देश हा काम धंदा किंवा उधरनिर्वाह करने इतक्या पुरता मर्यादित राहिलेसा नसून, सामूहिकरित्या एकत्रित मिळून आपले मतदारसंघ निर्माण करून इथली राजकीय सत्ता बळकावने इतपर्यंत गेली आहे, ही बाब अगदीच गंभीर असून त्याचा सर्वच राजकीय पक्षांनी विचार करणे गरजेचे आहे, म्हणून महराष्ट्रातील कोणत्याही राजकीय पक्षाने नैतिकतेचा आधार घेत कोणत्याही अमराठी व्यक्तीस राजकीय निवडणुक लढण्यास उमेदवारी देऊ नये.

तसेच राज्यात वाढत चाललेल्या बेरोजगारीत स्थलांतरीत परप्रांतीय अधिकच भर टाकत आहेत, येथील नोकऱ्या, खाजगी व शासकिय शिक्षण संस्थेत मिळणारे आरक्षणाचा लाभ ते घेत असल्याने येथील मराठीमाणसांना आपल्या हक्कापासून वंचित रहावे लागत आहे, हे रोखण्याकरिता जन्माने मराठी व पूर्वापार पासून या राज्याचे आदिवास असलेल्या नागरिकांनाच इथले आरक्षण व नोकरी मिळावी असा कायदा करणे गरजेचे आहे. मराठी शाळा, राज्य शासनाच्या घरकुल योजना, म्हाडाच्या लॉटरी यात होणारे परप्रांतीय वशिलेबाजी यावर आळा घालणे नितांत जरूर आहे, शासकीय कार्यालये, टपाल, रेल्वे, महाविद्यालये तसेच खाजगी व्यवसायिक अस्थापणे यांना मराठी भाषेचा प्रथम क्रमांकावर वापर करण्यासंबंधी राजभाषा अधिनियम १९६४ व भारतीय राज्यघटना व शासनीय भाषा कलम ३४५ नुसार राज्यातील व्यवहार राजभाषा मराठीत व्हावा यांकरीता एक समिती नेमावी व याचे पालन जो कोणी करणार नाही त्यावर कडक करवाई करण्यात यावी.

एखादी भाषा लुप्त होते किंवा मरणघटकेला पोहोचते तेव्हा तिच्या सोबत तिचा शेकडो वर्षांपासून चालत आलेला इतिहास, तिची संस्कृती, परंपरा आणि अखेर त्या भाषेतील साहित्य आपोआपच कायमचे लुप्त होते, आपण यांकरीताच का स्वतंत्र मराठी राज्याचा अट्टाहास केला होता का? कोणाकरिता तो मंगल कलश आणला गेलाय हा विचार मनात अनेक प्रश्न निर्माण करून आज अंगावर शहारे उमटून जातोय...

याचा आपण विचार करावा.......

धन्यवाद!

जय मराठी!

गोवर्धन सखाराम देशमुख

अध्यक्ष

९८९२८५१३४२

(केळ मिळाला)